MHSI06-000889-2022

संक्षिप्त फौजदारी खटला क्र.
४५४/२०२२
महा. शासन वि. वैशाली कुडतरकर
न्यायनिर्णय
नि. क्र. १५ लगत

## <u>न्यायनिर्णय</u>

(दिनांक ०३/०२/२०२६ रोजी घोषित)

आरोपी वैशाली विजय कुडतरकर हिचेविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५(ई) अन्वये संपरिक्षा चालविण्यात आली.

२. अभिलेखावरील पुरावा व आरोपीविरुध्द असलेले दोषारोप पाहता खालील मुद्दृदे विचारार्थी घेण्यात आले. त्यावरिल निष्कर्ष कारणमिमांसेसहित खालील प्रमाणेः-

| **अनु. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दिनांक १६/०९/२०२२ रोजी १६.१५ वाजणेचे सुमारास गांव मौजे सांगेली, सावरवाड, कुडतरकर टेंब येथे आरोपी एका किलतानाच्या पिशवीमध्ये बेकायदेशीररित्या गोवा बनावटीची दारु विक्री करण्याच्या उद्देशाने स्वतःजवळ बाळगलेल्या स्थितीत मिळुन आली व त्यायोगे आरोपीने महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५(ई) खालील शिक्षापात्र गुन्हा केल्याचे, अभियोगपक्षाने | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| | सिध्द केले आहे काय ? | |
| २. | आदेश काय ? | आरोपीची निर्दोष मुक्तता |

## **<u>का र ण मि मां सा</u>**

**३.** याकामी अभियोगपक्षाने आरोपीविरुध्दचे दोषारोप शाबीत करणेकरिता खालीलप्रमाणे साक्षीदार तपासले आहेत.

**अ) अभियोगपक्षाचे साक्षीदार :-**

| **अनु.क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|
| १. | ज्योती जगदीश दुधवडकर, म.पो.हे.कॉ. | फिर्यादी |

**ब) बचाव पक्षाचे साक्षीदार असल्यास :-**

| **अनु.क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क) न्यायालयीन साक्षीदार, असल्यास :-**

| **अनु.क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**अभियोगपक्ष, बचाव पक्ष व न्यायालयीन निशाणीची यादी**

**अ) अभियोग पक्ष :-**

| **अनु.क्र.** | **निशाणी नंबर** | **निशाणी नंबरचे स्वरुप** |
|---|---|---|
| ०१ | नि.क्र. १६- स. सा. क्र. १ | फिर्याद |

## ब) बचाव पक्ष :–

| अनु.क्र. | निशाणी नंबर | निशाणी नंबरचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## क ) न्यायालयीन निशाणी :–

| अनु.क्र. | निशाणी नंबर | निशाणी नंबरचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## ड) मुद्देमाल तपशील :–

| अनु.क्र. | मुद्देमाल क्रमांक | मुद्देमालाचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

४. आरोपीचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ (१) (ब) प्रमाणे जबाब नि. १५ लगत नोंदविणेत आलेला आहे.

५. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

**मुद्दा क्र.१ करिताः**

६. आरोपीवरील दोषारोप सिध्द करण्याकरिता अभियोग पक्षाच्या वतीने साक्षीदार क्र.१ फिर्यादी म. पो. हे. कॉ. ज्योती जगदीश दुधवडकर यांना तपासण्यात आले. सदर साक्षीदाराने त्यांच्या पुराव्या दरम्यान कथन केले आहे की, दि.१६/०९/२०२२ रोजी त्या सावंतवाडी पोलिस स्टेशन येथे पो. हे. कॉ. म्हणून कार्यरत असताना सदर दिवशी त्यांची माझी पेट्रोलिंगची ड्युटी होती. त्यावेळी सायंकाळी त्या व सोबत पीएसआय श्री.कराडकर, श्री. पाटील, पोहेकॉ श्री. नाईक असे शासकीय वाहन क्र. एमएच०७/एजे–२२७२ असे माडखोल हद्दीत पेट्रोलिंग करत असताना गुप्त बातमी मिळाली की, सांगेली

कुडतरकर टेंब येथे रहाणारी वैशाली विजय कुडतरकर ही तिच्या रहात्या घराच्या मागे बेकायदा दारु विक्रीचा व्यवसाय करीत आहे. त्याप्रमाणे ते सर्वजण दोन पंचांना घेवून घटनास्थळी गेले. तेथे घराच्या पाठीमागे नारळाच्या झाडाजवळ एक महिला संशयास्पद उभी असलेली दिसली. तिचा संशय आल्याने तिला जागीच थांबविले. तिच्या ताब्यातील किलतानाच्या पिशवीची पहाणी केली असता त्यामध्ये कमांडर थ्रीएक्स रमच्या १८० मिली मापाच्या २६ बाटल्या मिळून आल्या. त्यानंतर सदर मुद्देमालातुन एक बॉटल सी. ए. परिक्षणाकरीता काढून घेतली व उर्वरित मुद्देमाल जप्त करुन पंचनामा केला. त्यानंतर त्यांनी पोलिस स्टेशनला आरोपीविरुध्द फिर्याद (नि.१६) दिली. सदर साक्षीदाराने त्याच्या उलटतपासा दरम्यान, घटना ठिकाण हे रहदारीचा भाग आहे, घटनास्थळावरील जागा कोणाच्या मालकीची होती त्याबाबत कागदपत्रांची पडताळणी करुन खात्री केली नाही, जप्त मुद्देमालाचा बॅच नंबर, निर्मितीची व समाप्तीची तारीख त्यांना सांगता येणार नाही, घटनाठिकाणी आजुबाजुला लोकांची रहाती घरे आहेत, आरोपीचे आधारकार्ड पाहून आरोपीच्या नांवाची खात्री केली नाही, असे कबुल केले आहे.

७. अभियोग पक्षाने फिर्यादीच्या साक्षीतुन फिर्याद (नि.१६) शाबीत केली आहे. सदर साक्षीदाराच्या साक्षीस दुजोरा देण्यासाठी इतर कोणताही साक्षीदार अभियोग पक्षाच्या वतीने तपासण्यात आलेला नाही. अभियोग पक्षाने पंचांची साक्ष घेवून पंचनामा शाबीत करुन घेतला नाही. तसेच घटना ठिकाण हे वर्दळीचे असताना कोणत्याही स्वतंत्र साक्षीदाराची साक्ष नोंदविण्यात आली नाही. रासायनिक परिक्षण अहवाल शाबीत करण्यात आला नाही. अभिलेखावर आलेल्या साक्षीदारांच्या तोंडी पुराव्यावरुन आरोपीविरुध्द असलेले दोषारोप निःसंशयपणे सिध्द होत नाही. त्यामुळे, मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष नकारार्थी देण्यात येते व मुद्दा क्र. २ करिता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

// //

स.के.नं.४५४/२०२२
न्यायनिर्णय,
नि. १५ लगत

## आदेश

१. आरोपीस महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५(ई) खालील गुन्हयातुन फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीचे वैयक्तिक बंधपत्र व जातमुचलका रद्द करण्यात येत आहे.

३. जप्त मुद्देमाल अपील कालावधी संपल्यानंतर नष्ट करण्यात यावा.

४. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७–अ अन्वये रक्कम रु. १५,०००/– चे वैयक्तिक बंधपत्र दाखल करुन अपीलात हजर राहण्याची ग्वाही द्यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

JAHEDA MOHMED MISTRY
Digitally signed by JAHEDA MOHMED MISTRY
Date: 2026.02.03 17:57:51 +0530

सावंतवाडी
दिनांकः ०३/०२/२०२६

(जा.म. मिस्त्री)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
सावंतवाडी